दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३८ वा रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मराठवाड्याच्या हक्काचे पाणी पळविणाऱ्या आघाडीला त्यांची जागा दाखवा - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर





निलंगा/प्रतिनिधी:- मराठवाड्यातील दुष्काळ कायमचा दूर करण्यासाठी तत्कालीन भाजपा सरकारने मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प मंजूर करून त्यासाठी निधीची तरतूद केली होती.परंतु नंतरच्या महाविकास आघाडी सरकारने हा प्रकल्प रद्द केला.त्यामुळे दुष्काळाचा प्रश्न सुटला नाही. आघाडी सरकारने मराठवाड्याच्या हक्काचे पाणी पळविले.या आघाडीला त्यांची जागा दाखवून द्या,असे आवाहन माजी मंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

पाण्यासाठी हा प्रकल्प आवश्यक असून त्यासाठी राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकार येणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

आशीर्वाद यात्रेच्या चौथ्या दिवशी आ.निलंगेकर यांनी मतदारसंघातील डोंगरगाव, तळेगाव,बोरी,हालकी,बेवनाळ, बेवनाळवाडी,सावरगाव, हिप्पळगाव,थेरगाव,रापका, जोगाळा,आरी,बिबराळ,बाकली, राणी अंकुलगा,घुग्गी सांगवी व सांगवी येथे भेटी दिल्या. यादरम्यान नागरिकांशी संवाद साधताना आ.निलंगेकर बोलत होते.त्यांच्या समवेत तालुकाध्यक्ष मंगेश पाटील,माजी जिप सभापती गोविंद चिलकुरे, संगायोचे अध्यक्ष अनिल शिंदे, भाजयुमो तालुकाध्यक्ष प्रसाद पाटील,माजी जिप सदस्य ऋषिकेष बद्दे,नागनाथ चलमले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुधीर पाटील,नवनाथ डोंगरे,शहराध्यक्ष विनोद धुमाळे,महिला आघाडीच्या जगदेवीताई सुगावे, सरपंच कालिंदाताई काळे, उपसरपंच भालचंद्र पाटील, तंटामुक्त समिती अध्यक्ष विनायक पाटील,माजी पोलीस पाटील तात्याराव पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की,राज्यात काम करत असताना लातूर आणि मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी पाठपुरावा केला होता.सरकारने त्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प मंजूर करून निधीची तरतूद केली होती.हा प्रकल्प पूर्ण झाला असता तर आज दुष्काळाची समस्या मिटली असती. आ. निलंगेकर म्हणाले की,नंतर आलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारने हा प्रकल्प रद्द केला.त्यामुळे दुष्काळ व पाण्याची समस्या अद्यापही तशीच आहे.हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणे आवश्यक आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून मतदार संघातील सर्व नदी=नाल्यातून बारा महिने पाणी वाहण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळ मुक्तीसाठी आगामी २० तारखेला कमळाच्या चिन्हासमोरील बटन दाबून महायुतीला विजयी करा,असे आवाहन त्यांनी केले.

महायुतीच्या सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि प्रगतीसाठी काम केले.यापुढेही हे काम.आपण करतच राहणार आहोत मतदारसंघात विकास कामे करताना अक्का फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे उपक्रम आपण सातत्याने राबवले आहेत. मतदारसंघातील महिलांची लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी करून घेत त्यांना लाभ मिळवून दिला आहे.भविष्यात स्त्री शिक्षणासाठी आपण काम करणार आहोत. प्रत्येक गावाच्या विकासासाठी काम करणे हेच आपले ध्येय असल्याचेही आ. निलंगेकर म्हणाले.

यावेळी रिपाई आठवले गटाचे अंकुश ढेरे, तालुकाध्यक्ष संदीप कांबळे, निलंगा शहराध्यक्ष विनोद सुरवसे, शहर उपाध्यक्ष लहू ढेरे,महिला आघाडीच्या जगदेवीताई सुगावे,उपसरपंच प्रीतम माने,भागवत गोळेगावे, कृष्णाजी तेलंगे,सरफराज पठाण, अमोल भुसागरे,सद्दाम शेख,जहीर शेख,मौला शेख यांच्यासह महायुतीचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली प्रकाश आंबेडकरांची भेट

पुणे : प्रतिनिधी विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या तब्येतीची विचारपूस करून त्यांना लवकरात लवकर बरे होऊन जनसेवेत रुजू होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.



तसेच इथे जवळच सभा होती आणि प्रकाश आंबेडकरांचे नुकतच ऑपरेशन झालं होतं म्हणून भेटायला आलो होतो. याचा कुठलाही राजकीय अर्थ काढू नका, असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केले आहे. यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, प्रत्येक भेटीकडं राजकीय दृष्टीनं बघू नका. तसंच राजकीय अर्थ देखील काढू नका. प्रकाश आंबेडकर हे माझे चांगले मित्र असून त्यांची काही दिवसांपूर्वीच अँजीओप्लास्टी झाली. माझी बाजुलाच सभा असल्यामुळे मी त्यांना भेटलो आणि ही भेट आमची सदिच्छा भेट होती. यात राजकीय काहीही नव्हते. उपमुख्यमंर्त्यांनीही घेतली भेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही नुकतीच प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना अजित पवार म्हणाले की, प्रकाश आंबेडकर यांची काही दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया झाली आहे. त्यांच्या तब्येतीबाबत विचारपूस करण्यासाठी आलो होतो.

## धर्मा-धर्मात, जातीपातीमध्ये तेढ निर्माण करू नये

नांदेड : प्रतिनिधी सत्ताधारी पक्षाची जातीयवादी भूमिका आहेच, ती पुन्हा एकदा त्यांनी समोर आणली आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. बेटेंगे तो कटेंगे या प्रचारावर पवार यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. निवडणुका येतात आणि जातात, पण धर्मा-धर्मात, जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम कुणी करू नये.

## महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





उदगीर/ प्रतिनिधी :- उदगीर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्र. ८ मधून भव्य रॅली काढली. प्रभागातील नागरिकांनी या रॅलीस उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार गोविंदराव केंद्रे यांच्या हस्ते या रॅलीचा चौबारा येथे शुभारंभ करण्यात आला. चौबारा येथून निघालेली ही रॅली जुने बालाजी मंदिर, होळी चौक, पारकट्टी गल्ली, तळवेस मार्गे फुले नगर येथे आल्यानंतर या ठिकाणी रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे यांनी गेली पाच वर्षे उदगीरचे आमदार व राज्याचे मंत्री म्हणून काम करीत असताना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी येथील जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली आहे अशा प्रामाणिक नेतृत्वाला जपण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा एकदा ना. संजय बनसोडे यांना निवडून द्यावे असे आवाहन माजी आमदार गोविंद केंद्रे यांनी केले. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, सुधीर भोसले, समीर शेख, अनिल मुदाळे, समद शेख, राजकुमार मुक्कावार, उत्तरा कलबुर्गे, राजकुमार हुडगे, फैजुखान पठाण, इम्तियाज शेख, दत्ता पाटील, अनिल मुदाळे, गिरीश उप्परबावडे, अभिजित औटे, पप्पु गायकवाड, मझहर पटेल, अमोल अनकल्ले, रुपेंद्र चव्हाण मारोती कोटलवार, शफी हाशमी, व्यंकट बोईनवाड, राजकुमार हुडगे, नामदेव आपटे, सतिश कांबळे, राजकुमार गंडारे, ॲड. वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, शामला कारामुंगे, मंदाकिनी जीवने, उषा माने, सरोजा वारकरे, शिवकर्णा अंधारे,स्वाती वट्टमवार, बबीता पांढरे, शिवगंगा बिरादार, अभिजीत औटे, रामेश्वर पवार,आनंद बुंदे, संजय जाधव नामदेव आपटे, धोंडीबा मोरे, फैयाज शेख, शफी हाशमी, अमर सूर्यवंशी, आकाश झिल्ले, बाबासाहेब सूर्यवंशी, अविनाश गायकवाड, संजय पांढरे, अनिकेत गुडमेवार, प्रशांत रंगवाळ, प्रसाद पांढरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## संकल्प प्रतिष्ठान लातूर व विश्वकर्मा पांचाळ संघटनाकडून महाविकास आघाडीच्या जिल्हयातील सर्व उमेदवारांना जाहीर पाठींबा

लातूर :- संकल्प प्रतिष्ठान लातूर व विश्वकर्मा पांचाळ संघटना लातूरने या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे लातूर जिल्ह्यातील सर्व उमेदवारांना जाहीर पाठिंब्याचे पत्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांना सुपूर्द केले महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील गंजगोलाई येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुतळ्या नजीक महाविकास आघाडीची प्रचार सभा संपन्न झाली. या प्रचार सभेत संकल्प प्रतिष्ठान लातूर व विश्वकर्मा पांचाळ संघटना लातूरने महाविकास आघाडीच्या लातूर जिल्ह्यातील सर्व उमेदवारांना या विधानसभा निवडणुकीतील जाहीर पाठिंब्याचे पत्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्याकडे सुपूर्द केले. या संघटनेचे सर्व पदाधिकारी जाहीर पाठींबा देऊन महाविकास आघाडीच्या प्रचारात सक्रीय झाले आहेत.




## वंचितचे उमेदवार विनोद खटके यांच्या प्रचारार्थ ॲड. प्रकाश आंबेडकर यांची लातुरात आज विराट सभा





लातूर : लातूर विधानसभा मतदार संघाचे वंचित बहूजन आघाडीचे अधिकृत उमेदवार विनोद खटके यांच्या प्रचारश्ररार्थ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांची १० नोव्हेंबर रोजी लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर सकाळी ११ वाजता विराट सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेसाठी वंचितचे स्टार प्रचारक ॲड. सर्वजीत बनसोडे, तय्यब जफर यांच्यासह अनेक वरिष्ठ मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या सभेला लातूरकरांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडी लातूरच्या वतीने करण्यात आले आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांची विराट सभा लातूरमधील ऐतिहासिक सत्ता परिवर्तनाची नांदी ठरणार आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर नुकतीच एंजिओप्लास्टिची शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. तरी देखील मराठवाड्यात त्यांच्या सहा सभा होणार आहेत. लातूर येथील विराट सभा सकाळी ११वाजता वेळेवर सुरु होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी १० वाजताच उपस्थित राहावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांनी केले आहे. या विराट सभेला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी लातूर जिल्हा प्रभारी रमेश गायकवाड जिल्हाध्यक्ष सलीम भाई सय्यद महिला जिल्हाध्यक्ष मंजुषाताई निंबाळकर जिल्हा महासचिव ॲड. रोहित सोमवंशी, जिल्हा संघटक सचिन लामतुरे शहराध्यक्ष सचिन गायकवाड शहर महासचिव आकाश इंगळे महिला शहराध्यक्ष सुजाताई अजनीकर युवा शहराध्यक्ष महेंद्र बनसोडे युवा जिल्हाध्यक्ष युवराज जोगी जिल्हा महासचिव नितीन गायकवाड यांच्यासह संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय....

# ठरावाचा अर्थ

जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा बहाल करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव राज्य विधानसभेत संमत झाला आहे. निवडणुकीच्या वेळी नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला यांनी मतदारांना जे आश्वासन दिले आहे त्याची त्यांनी पूर्ती केली किंवा त्याचा दिखावा केला एवढाच या खटाटोपाचा अर्थ. त्याचे कारण केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा बहाल करणारे कलम ३७० रद्द केले आहे आणि ते परत आणायचे असेल तर राज्याच्या विधानसभेत नाही तर संसदेत त्याचा निर्णय होणार आहे. त्यामुळे दबाव किंवा राजकारण करून त्यातून काहीच साध्य होणार नाही. विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्षांकडून व विशेषत: जम्मू-काश्मीरमधील पक्षांकडून हाच विषय जोरदारपणे मांडला गेला. हे कलम पुन्हा आणणार असे आश्वासन नॅशनल कॉन्फरन्स आणि पीपल्स डेमोक्रेटिक पार्टी म्हणजे पीडीपीने दिले होते. आता निवडणुका झाल्यानंतर याच विषयाला हवा देण्याचा प्रयत्न होतो आहे. विधानसभेत गदारोळ झाला, धक्काबुक्कीही झाली. संमत झालेल्या प्रस्तावात विशेष दर्जा आणि त्याला घटनात्मक हमी देण्यासाठी राज्यातील निवडून आलेल्या प्रतिनिधींशी चर्चा केली जाण्याची मागणी करण्यात आली आहे. सभागृहाच्या कार्यपत्रिकेत हा विषयच नव्हता, तो अचानक घुसवण्यात आला असा भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांचा आरोप आहे. काही संतप्त सदस्यांनी सभागृहातच प्रस्तावाच्या प्रतीही फाडल्या. एकुणातच हा प्रकार भारतीय राजकारणात अभूतपूर्व असा नसला तरी लज्जास्पद नक्कीच होता. उमर अब्दुल्ला यांना याची चांगली कल्पना आहे किंबहुना निवडणुकीच्या प्रचारात भाषणे करतानाही त्यांना ती होती की आपण आश्वासन दिले आणि सत्तेवर आल्यावर विधानसभेत असा प्रस्ताव संमत करवूनही घेतला तरी जम्मू-काश्मीरला आता पुन्हा विशेष राज्याचा दर्जा प्राप्त करून देणे सोपे नाही. ती अत्यंत किचकट, अवघड आणि अशक्यप्राय गोष्ट आहे. त्यांनी आम्ही दिलेला शब्द पूर्ण केला एवढे दर्शवण्यासाठी हा सुटकेचा मार्ग शोधला.

पीडीपीच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांचीही विशेष दर्जाची मागणी आहे. मात्र उमर यांच्या सरकारने जे केले त्यावर त्यांनी अर्धवट उचललेले पाऊल अशी संभावना करून टीका केली. प्रस्ताव संमतीचे स्वागत आणि निषेध या दोन्ही बाबी होत असल्या तरी सर्वंकष विचार केला तर हा धूळ फेकण्याचा किंवा दिशाभूल करण्याचा प्रकार आहे. त्याचे कारण असे की जम्मू-काश्मीर हे आता पूर्ण राज्य नाही. हा केंद्रशासित प्रदेश आहे. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी विधानसभेत कोणताही प्रस्ताव किंवा विधेयक संमत केले तर ते अंतिम मंजुरीसाठी नायब राज्यपालांकडे पाठवावे लागते अन् नायब राज्यपाल हे केंद्र सरकारचे प्रतिनिधी असतात. राज्याचा कोणताही निर्णय केंद्राच्या भूमिका आणि धोरणांशी सुसंगत असेल तरच नायब राज्यपालांकडून त्याला संमती दिली जाते. अन्यथा अशी विधेयके आणि ठराव त्या ठिकाणीच अडकून पडतात व ती दिल्लीपर्यंत पोहोचतही नाहीत.

मुळात कलम ३७० रद्द करणे हा निर्णय केंद्रातील भारतीय जनता पार्टीच्या सरकारने एका रात्रीत घेतला नव्हता. या पक्षाच्या स्थापनेपासूनच त्यांच्या अजेंड्यावर हा विषय होता. या संदर्भात भाजपच्या आताच्या नेतृत्वाने आणि अगोदरच्याही नेत्यांनी आणि त्यांना वैचारिक पाठबळ देणार्या संघटनांनी भरपूर गृहपाठ केला होता. कलम निष्प्रभ करण्यासाठी अगोदरच जम्मू-काश्मीरचे विभाजन करून दोन केंद्रशासित प्रदेश तयार केले गेले. ५ ऑगस्ट २०१९ रोजी प्रचंड पूर्वतयारीने मात्र अचानक घेतल्या गेलेल्या या निर्णयामुळे केवळ काश्मीरच नाही तर देशभरातील सर्वच राजकीय पक्ष अवाक झाले. निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिकांचा ढिग लागला. ५ डिसेंबर २०२३ रोजी पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने केंद्र सरकारचा हा निर्णय कायम ठेवला. जर देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही यावर शिक्कामोर्तब केले आहे आणि आपल्या प्रस्तावाला नायब राज्यपालांची संमती मिळणे आवश्यक आहे याची पूर्ण कल्पना सत्ताधारी पक्षाला असूनही त्यांनी प्रस्ताव मांडला आणि संमत करवून घेतला, हा दिशाभूलीचा प्रकार नाही तर अन्य काय आहे? केवळ केंद्रातील सत्ताधारी पक्षच नव्हे, तर घटनेच्या जाणकारांच्या म्हणण्यानुसारही कलम ३७० पुन्हा आणले जाणे आता अशक्यच आहे. त्याचे कारण असे की २०१९ मध्येच राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे घटनेच्या कलम ३६७ मध्ये दुरुस्ती केली गेली होती. त्या दुरुस्तीमुळेच कलम ३७० हटवण्याचा मार्ग मोकळा झाला होता. घटनेत कोणतीही दुरुस्ती करायची असेल तर त्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांत दोनतृतीयांश मतांनी दुरुस्ती विधेयक संमत व्हावे लागते. याखेरीज देशातील निम्म्यापेक्षा जास्त विधानसभांची त्यासाठी संमती लागते. कलम ३७० परत आणण्यासाठी हे सगळे करावे लागेल. विद्यमान भाजपच्या राजवटीत ते परत आणले जाणार नाही आणि भविष्यात जर कोणते अन्य सरकार आणले तरी हा सगळा काथ्याकुट त्यांना जमेलच असे नाही आणि संख्याबळानुसार त्यांना ते साधता येणे शक्यही होत असले तरी देशभावना लक्षात घेऊन कोणी त्या भानगडीत पडेल असे वाटत नाही. राहिला प्रश्न राज्याला पूर्ण दर्जा द्यायचा तर त्याला केंद्र सरकारने ना म्हटलेले नाही. तोपर्यंत उमर आणि त्यांच्या सरकारनेही सबुरीने घेतले पाहिजे.

# दुर्बलांची काळजी घेणारे टाटा

रतन टाटा यांनी स्पर्श केलेल्या जीवनात आणि त्यांनी जोपासलेल्या स्वप्नांमध्ये ते चिरायू आहेत. भारताला एक चांगले आणि अधिक आशादायी ठिकाण बनवल्याबद्दल पुढच्या पिढ्या त्यांच्या कृतज्ञ असतील.

रतन टाटा आपल्याला सोडून गेले त्याला एक महिना झाला आहे. गजबजलेल्या शहरांपासून ते छोटी शहरे, अगदी गावांपर्यंत, समाजातल्या प्रत्येक क्षेत्रात त्यांची उणीव तीव्रतेने जाणवत आहे. प्रस्थापित उद्योगपती, होतकरू उद्योजक आणि मेहनती व्यावसायिक सर्वांनीच त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. पर्यावरणाप्रती सजगता आणि परोपकाराला वाहून घेतलेल्या प्रत्येकालाही तितकेच दु:ख झाले. त्यांच्या निधनाने देशाला तर त्यांची अनुपस्थिती तीव्रतेने जाणवली त्याचबरोबर जगालाही ती जाणवली.

रतन टाटा युवकांसाठी प्रेरणास्थान होते. स्वप्ने ही साकारायची असतात. करुणा आणि विनम्रता बाळगत यश साध्य होऊ शकते याचे स्मरण ते करून देतात. इतरांसाठी त्यांनी भारतीय उद्योजकतेची सर्वोत्कृष्ट परंपरा सादर केली आणि प्रामाणिकपणा, सर्वोत्कृष्टता आणि सेवा या मूल्यांप्रती ठाम कटिबद्धता जोपासली. त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने आदर, सचोटी आणि विश्वासार्हता जपत जगभरात नवी शिखरे गाठली. तरीही अतिशय विनम्रतेने आणि दयाळूपणे त्यांनी हे यश स्वीकारले. इतरांची स्वप्ने साकारण्यासाठी ठाम आधार देणे हा रतन टाटा यांचा एक अनोखा गुण होता. अलीकडच्या वर्षांत भारताच्या स्टार्ट अप परिसंस्थेचे मार्गदर्शक म्हणून ते ओळखले जात असत. अनेक आशादायी प्रकल्पांमध्ये त्यांनी गुंतवणूक केली.

युवा उद्योजकांच्या आशा-आकांक्षा त्यांनी जाणल्या आणि भारताच्या भविष्याला आकार देण्याची त्यांची क्षमता ओळखली. अशा युवांना पाठबळ देत धाडस आणि पूर्णक्षमतेनिशी काम करण्यासाठी अशी स्वप्ने पाहणार्या पिढीला त्यांनी सबल केले. यातून नवोन्मेश आणि उद्योजकतेची संस्कृती निर्माण होण्यासाठी मोठी मदत झाली आणि याचा येत्या दशकांमध्ये भारतात सकारात्मक प्रभाव जारी राहील याचा मला विश्वास आहे. त्यांनी नेहमीच सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार केला आणि भारतीय उद्योगाने जागतिक मापदंड स्थापित करण्याचा आग्रह ठेवला.हा दृष्टिकोन भारताला, जागतिक तोडीची गुणवत्ता बनवण्यासाठी आपल्या भावी उद्योजकांना प्रेरणा देत राहील याचा मला विश्वास आहे.

सर्व मानवतेप्रती त्यांची परोपकारी दृष्टी होती. प्राण्यांप्रती त्यांचा दयाळूपणा सर्व परिचित आहे, प्राण्यांच्या कल्याणासाठीच्या प्रत्येक प्रयत्नाला त्यांचे सहकार्य राहिले. एखाद्या व्यवसाय प्रकल्पाप्रमाणेच त्यांच्या जीवनाचा भाग बनलेल्या त्यांच्या श्वानाचे फोटो ते अनेकदा प्रसिद्ध करत. त्यांचे जीवन आपल्याला, खरे नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व हे केवळ एखाद्याच्या कामगिरीने नव्हे तर दुर्बलांची काळजी घेण्याच्या क्षमतेने मापले जाते याचे स्मरण करून देते.

कोट्यवधी भारतीयांच्या दृष्टीने, रतन टाटा यांची देशभक्ती संकटकाळात सर्वात तेजस्वी ठरली होती. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईतील प्रतिष्ठित ताज हॉटेल त्यांनी झपाट्याने पुन्हा उघडणे म्हणजे भारत दहशतवादाला नकार देत एकजुटीने उभा आहे, हे राष्ट्राला सूचित करणारे होते. व्यक्तिगतरीत्या मला अनेक वर्षांपासून त्यांना जवळून जाणून घेता आले. आम्ही गुजरातमध्ये एकमेकांसोबत काम केले, जिथे त्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली, त्यातील अनेक प्रकल्पांवर त्यांचा खूप जीव होता. काही आठवड्यांपूर्वी, मी स्पेन सरकारचे अध्यक्ष पेड्रो सांचेझ यांच्यासमवेत वडोदरा येथे होतो आणि आम्ही संयुक्तपणे एका विमान संकुलाचे उद्घाटन केले, जेथे सी-२९५ विमाने भारतात बनवली जातील. रतन टाटा यांनीच यावर काम सुरू केले होते. रतन टाटा यांची अनुपस्थिती आम्हाला फारच जाणवली हे वेगळे सांगायला नको.

मला रतन टाटा हे पत्रलेखक म्हणूनही स्मरणात आहेत. ते वारंवार मला निरनिराळ्या मुद्द्यांवर पत्र लिहीत असत, मग ते प्रशासनाचे विषय असोत, सरकारच्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे असो किंवा निवडणूक विजयानंतर अभिनंदनाच्या शुभेच्छा असोत.जेव्हा मी केंद्र सरकारमध्ये गेलो तेव्हाही आमचा निकटचा संवाद कायम राहिला आणि ते राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांमधील एक वचनबद्ध भागीदार राहिले. रतन टाटा यांनी ‘स्वच्छ भारत मिशन’ला दिलेला पाठिंबा महत्त्वाचा होता. भारताच्या प्रगतीसाठी स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता आणि साफसफाई अत्यावश्यक आहे हे समजून ते या लोकचळवळीचे मौखिक पुरस्कर्ते बनले. ऑक्टोबरच्या सुरुवातीला ‘स्वच्छ भारत मिशन’च्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी दिलेला व्हिडिओ संदेश मला अजूनही आठवतो.

मला दोन वर्षांपूर्वीचा आसाममधील कार्यक्रम आठवतो, जिथे आम्ही राज्यातील विविध कर्करोग रुग्णालयांचे संयुक्तपणे उद्घाटन केले होते. त्यावेळच्या त्यांच्या टिप्पण्यांमध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, त्यांना त्यांची शेवटची वर्षे आरोग्यसेवेसाठी समर्पित करायची आहेत. आरोग्य आणि कर्करोग उपचार सेवा सुलभ आणि परवडण्याजोगी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे मूळ हे त्या रोगांशी लढा देत असलेल्या रुग्णांबद्दलच्या सहानुभूतीमध्ये होते. समाजातील सर्वात दुर्बळांच्या/असुरक्षितांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हेच न्याय्य असल्याचा त्यांना विश्वास होता. आज जेव्हा आपण त्यांची आठवण काढतो, तेव्हा आपल्याला त्यांनी कल्पिलेल्या समाजाची आठवण होते जिथे व्यवसाय हा भल्यासाठी असणारी एक शक्ती म्हणून काम करू शकतो, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतेचे मूल्य असते आणि जिथे प्रगती ही सर्वांच्या कल्याण आणि आनंदात मोजली जाते.



# खासगी मालमत्तेचा हक्क?

अलीकडेच म्हणजे मंगळवार, ५ नोव्हेंबर रोजी आपल्या सर्वोच्च न्यायालयाने एक अतिशय महत्त्वाचा निकाल दिला आहे. हा निकाल व्यक्तीच्या खासगी मालमत्तेच्या हक्काबाबत आहे. अभ्यासकांच्या मते, व्यक्तीच्या खासगी मालमत्तेच्या हक्काबाबतचा निकाल अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे. या निर्णयाची व्यापक चर्चा करणे गरजेचे आहे. ‘सार्वजनिक हिताच्या नावाखाली सरकार सरसकट प्रत्येक खासगी मालमत्ता अधिग्रहित करू शकत नाही’ हा सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निकालामुळे खासगी मालमत्ताधारकांच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब झाले. हा निर्णय नऊ न्यायमूर्तींच्या (सात विरुद्ध दोन) घटनापीठाने दिला आहे. यामुळे यापुढे सरकारला खासगी मालमत्ता ‘जनहितासाठी’ म्हणत सरसकट ताब्यात घेता येणार नाही. परिणामी या संदर्भातील सरकारच्या मनमानीला चाप बसला आहे. समाजात उपलब्ध असलेली सर्व खासगी मालमत्ता किंवा नैसर्गिक साधनसंपत्ती सामाजिक हितासाठी वापरता येईल. मात्र त्यासाठी आता प्रत्येक निर्णयाच्या संदर्भात सरकारला सार्वजनिक समर्थन द्यावे लागेल.

‘सार्वजनिक हिताच्या संदर्भात खासगी मालमत्ता’ हा मुद्दा तसा फार जुना आहे. मुख्य म्हणजे आताचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय म्हणजे सुमारे तीन दशकांपूर्वी सुरू झालेल्या वादावर पडलेला पडदा, असेही म्हणता येईल. आता या निर्णयानुसार खासगी जमीन सार्वजनिक हितासाठी संपादित करण्यासाठी प्रत्येक प्रकरणाची चौकशी केली जाईल, असाही या निर्णयाचा अर्थ आहे. आपल्या देशात ‘खासगी मालमत्ता’ हा तसा फार वादग्रस्त मुद्दा आहे. याबद्दलचे अनेक वाद २६ जानेवारी १९५० रोजी स्थापन झालेल्या ‘प्रजासत्ताक भारतात’ सुरू झाले. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यघटनेच्या तिस-र्या प्रकरणात नागरिकांना जे मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत, त्या सुमारे अर्धा डझन मूलभूत अधिकारांत ‘खासगी मालमत्तेचा हक्क’ होता. यामुळे समाजवादी विचारांच्या पंडित नेहरू सरकारची फार पंचाईत झाली.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात काँग्रेसने आश्वासन दिले होते की स्वातंत्र्यानंतर जमीनदारी नष्ट केली जाईल. त्यानुसार १९४९ साली स्वतंत्र भारतात उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन राज्यांनी ‘जमीनदारी निर्मूलन कायदा’ संमत केला. ज्या दिवशी असे कायदे पारित झाले त्याच्या दुसर्या दिवशी जमीनदारांनी आपापल्या राज्यांतील उच्च न्यायालयात या कायद्यांना आव्हान दिले. जमीनदारांच्या मते ‘खासगी मालमत्तेचा हक्क’ हा जर मूलभूत हक्क आहे, तर सरकारला जमीनदारी निर्मूलन कायदा करण्याचा अधिकारच नाही. यामुळे पंडित नेहरूंचे सरकार अस्वस्थ झाले. यातूनच मग मे १९५१ मध्ये पहिली घटनादुरुस्ती करावी लागली आणि जमीनदारी निर्मूलन कायदा वैध ठरला. यातूनच पुढे जमीनदारांची अतिरिक्त जमीन सरकारने ताब्यात घेतली आणि ‘कसेल त्याची जमीन’ हे तत्त्व लागू केले.

असं झालं तरी या बाबतीतल्या कटकटी आणि न्यायालयीन लढाया सुरूच राहिल्या. शेवटी मोरारजी देसाई यांच्या सरकारने १९७८ साली ४४ वी घटनादुरूस्ती करून खासगी मालमत्तेच्या अधिकाराला ‘मूलभूत अधिकाराच्या यादीतून काढले आणि ‘साध्या अधिकारांच्या यादीत टाकले. यानंतरच्या लढाईचा पुढच्या टप्पा म्हणजे जनहितासाठी सरकार खासगी मालमत्ता ताब्यात घेऊ शकते की नाही? यातील बारकावे समजून घेतले पाहिजे. महाराष्ट्र सरकारने घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि जुन्या इमारतींच्या देखभालीसाठी ‘म्हाडा’ ही यंत्रणा उभी केली. यासाठी केलेल्या कायद्यात १९८६ साली काही दुरुस्त्या करण्यात आल्या. त्याकाळी मुंबई महानगरात मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न ज्वलंत होता. १९४० सालच्या आधी बांधलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रश्न खदखदत होता. मात्र अशा इमारतींत मालक आणि जुने भाडेकरू यांच्यात वाद होते. जुन्या भाडेकरूंना कोठे वीस रुपये तर कोठे पंधरा रुपये भाडं द्यावं लागत होतं.

पर्मनंट टेनन्सी कायद्यानुसार जोपर्यंत भाडेकरू नियमित भाडं देत आहे, तोपर्यंत मालक भाडेकरूकडून घर खाली करून घेऊ शकत नाही. पुढे सरकलेल्या काळाच्या संदर्भात पंधरा रुपये किंवा वीस रुपये भाडं इतकं किरकोळ झालं की मालक घरांच्या देखभाल-दुरुस्तींकडे दुर्लक्ष करू लागले. नंतर आलेल्या कायद्यानुसार जर उपकर प्राप्त इमारतीतील ७० टक्के रहिवासी तयार असतील तर अशा इमारती ‘म्हाडा’ने ताब्यात घ्यायच्या आणि मालकांना भाड्याच्या शंभरपट रक्कम नुकसानभरपाई द्यायची, असा कायदा आला. अपेक्षेनुसार या दुरूस्तीला इमारत मालकसंघाने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाने १९९१ साली फेटाळून लावली. इमारत मालक संघाने याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आता सुमारे ३३ वर्षांनी त्या याचिकेचा निकाल आला आहे.

तसं पाहिलं तर खासगी मालमत्ता ताब्यात घेण्याच्या संदर्भात न्यायपालिकेने वेळोवेळी निर्णय दिलेले आहेत. काही वर्षांपूर्वी घटनेच्या कलम ३९ (ब) नुसार सर्व खासगी मालकीच्या जमिनी सरकार ताब्यात घेऊ शकते, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. सरकारने या संदर्भात केलेल्या कायद्यात मालकांची बाजू ऐकून घेण्याची तरतूद होती व आहे. मात्र प्रत्यक्षात याबद्दल सरकार नेहमी घाई करत असते, असा आजवरचा अनुभव आहे. याला पुरोगामी महाराष्ट्रसुद्धा अपवाद नाही. समृद्धी महामार्ग वगैरे सारख्या प्रकल्पांना जमिनी देण्यास तयार नसलेल्या शेतकर्यांकडे सरकारने कसे दुर्लक्ष केले, याच्या आठवणी ताज्या आहेत. अर्थात, अशा गुंतागुंतीच्या प्रकरणात कोणी नायक किंवा कोणी खलनायक नसतो, हेही लक्षात ठेवलेले बरे. जर सरकारने जमीन मालकांच्या तक्रारींकडे लक्ष द्यायचं ठरवलं तर पायाभूत सुविधा देणारे विकासप्रकल्प प्रत्यक्षात यायला कितीतरी वेळ लागेल? ही सरकारची बाजूसुद्धा समजून घेतली पाहिजे.

सुरुवातीला हे तर्कशास्त्र योग्य वाटत होतं. आता २०२४ साली याच्या अनेक बाजू समोर येत आहेत, त्यांचा विचार करावा लागेल. उदाहरणार्थ, मेट्रो किंवा मोनो ट्रेनसारख्या ‘पायाभूत सुविधा’ या गटात मोडणारे विकास प्रकल्प. या विकास प्रकल्पांसाठी जमिनी घेतल्या, नंतर त्यावर हे महाकाय प्रकल्प उभे राहिले. आता असं लक्षात येतं आहे की या प्रकल्पांतून सरकारला अपेक्षित उत्पन्न आणि सामाजिक फायदे मिळत नाही. या स्थितीत सरकारला सरसकट जमिनी ताब्यात घेण्याचा अधिकार असावा? हा प्रश्न समोर येताच आता सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे. त्यामुळे आता सरकारलासुद्धा अशा प्रकल्पांबद्दल घाई करण्याची गरज राहणार नाही.



एवढेच नव्हे तर या पुढे सरकारला प्रत्येक सार्वजनिक प्रकल्पाचे औचित्य सिद्ध करावे लागेल तसेच अशा प्रकल्पांचे व्यापक फायदे जनतेसमोर ठेवावे लागतील. या निकालावरून असे दिसते की न्यायपालिकेला सर्व प्रकल्पांची कठोर छाननी -मूल्यांकन, प्रकल्पांबद्दल व्यापक पातळीवर सल्लामसलत अभिप्रेत आहे. थोडक्यात म्हणजे एवढी वर्षे ज्याप्रकारे सरकार जमीन ताब्यात घेत असे, तसे आता यापुढे करता येणार नाही. तरीही विकास प्रकल्प आखावे लागतील, त्यासाठी जमिनी ताब्यात घ्याव्या लागतील. सरकारला यापुढे तारेवरची कसरत करावी लागेल, एवढे नक्की. लोकशाही शासनव्यवस्थेत अशाच प्रकारे सरकारं चालवावी लागतात.

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. ०१ लाख ५१ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त. ०२ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल.

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. ०१ लाख ५१ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त. ०२ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल.*

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

अवैध धंद्याची माहिती काढत असताना दिनांक ०८/११/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, अहमदपूर येथे काही व्यक्ती लपून-छपून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी साठवणूक व वाहतूक करीत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांने दिनांक ०८/११/२०२४ रोजी पोलीस ठाणे अहमदपूर हद्दीमधून घरामध्ये



साठवणूक करण्यात आलेला महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला ०१ लाख ५१ हजार ६५० रूपयाचा गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त केले आहे. प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या व्यवसायासाठी साठवणूक केल्याचे मिळून आलेले इसम नामे १) शेख नवीन अब्दुलगणी, वय २५ वर्ष, राहणार दस्तगीर गल्ली अहमदपूर. २)अन्वर सिकंदर सय्यद राहणार दस्तगीर गल्ली अहमदपूर.(फरार) यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे अहमदपूर चे पोलीस अधिकारी,अंमलदार करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार सचिन धारेकर , रामहरी भोसले, नाना भोंग, प्रदीप स्वामी, जमीर शेख यांनी पार पाडली.

# शाहरुख खानने स्मोकिंग सोडली; पण आता होतोय 'हा' भयंकर त्रास; जाणून घ्या याबाबतची डॉक्टरांची मते

शाहरुख खानने मुंबईत त्याच्या नुकत्याच झालेल्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनमध्ये जाहीर केले की, त्याने अखेर धूम्रपान सोडले आहे. दरम्यान, ही सवय सोडण्यासाठी तो खूप दिवसांपासून संघर्ष करीत होता. त्याबद्दल सांगताना शाहरुख म्हणतो, ही चांगली गोष्ट आहे की, मित्रांनो, मी आता धूम्रपान करीत नाही. सिगारेट सोडल्यानंतर मला श्वास घेण्यास कमी त्रास होईल, असे वाटले होते; पण तरीही तसे होत नाही. मला श्वास घ्यायला थोडा त्रास होतोच आहे. तो या बदलाशी जुळवून घेत असल्याचे त्याने कबूल केले. तो म्हणाला, मला वाटले की, मला श्वासोच्छ्वासाचा त्रास होत नाही; पण तरीही मला ते जाणवते. इन्शाअल्लाह, तेही लवकर बरे होवो. शाहरुख खान यापूर्वी धूम्रपान सोडण्याच्या आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याच्या त्याच्या इच्छेबद्दल बोलला आहे. शाहरुख सांगतो की, धूम्रपान सोडण्यासाठी त्याला मुलगा अबराम याने प्रेरित केले आहे. २०१७ मध्ये इंडिया टुडे कॉन्क्लेव्हमध्ये शाहरुख खानने एक गोष्ट शेअर केली, वयाच्या ५० व्या वर्षी माझ्या लहान मुलाची उपस्थिती असणे ही चांगली गोष्ट आहे. मात्र, तो जेव्हा मोठा होईल तेव्हा माझी उपस्थिती असेल का ही चिंता मला सतावते. त्यामुळे तुम्हीही कमी धूम्रपान, कमी मद्यपान अन् अधिक व्यायाम करीत राहा. मीसुद्धा सर्व सोडण्याचा आणि निरोगी व आनंदी राहण्याचा प्रयत्न करीत आहे. धूम्रपान सोडल्यानंतरही दम का लागतो? शाहरुख खानने सांगितल्याप्रमाणे धूम्रपान सोडल्यानंतरही दम का लागतो? या संदर्भात बेंगळुरूचे सार्वजनिक आरोग्य विचारवंत डॉ. जगदीश हिरेमठ यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. दीर्घकाळ धूम्रपान केल्याने फुप्फुसांच्या उतींचे नुकसान होते, ज्यामध्ये लहान हवेच्या पिशव्यांमधील लवचिकता कमी होते. त्यामुळे धूम्रपान सोडल्यानंतरही फुप्फुसांना बरे होण्यास बराच वेळ लागतो. नवी दिल्ली येथील विभू नर्सिंग होमचे वरिष्ठ सल्लागार पल्मोनोलॉजिस्ट डॉ. विभू कवात्रा स्पष्ट करताना सांगतात, धूम्रपान सोडल्यानंतर फुप्फुसे हळूहळू बरी होऊ लागतात; ज्यामुळे तात्पुरती जळजळ किंवा संवेदनशीलतेबाबतचा अधिक त्रास होऊ शकतो. धूम्रपान सोडल्यानंतर काही दिवसांत तुमच्या रक्तातील कार्बन मोनोऑक्साइडची पातळी सामान्य होते; ज्यामुळे तुमच्या उतींपर्यंत जास्त ऑक्सिजन पोहोचतो. डॉ. कवात्रा पुढे नमूद करतात की, पहिल्या काही आठवड्यांत तुमच्या श्वासनलिकेतील लहान केसांसारखी रचना (सिलिया) पुन्हा कार्य करते आणि त्यामुळे फुप्फुसांतील श्लेष्मा आणि कचरा साफ होण्यास मदत होते. अनेक महिन्यांत फुप्फुसांचे कार्य सुधारत असल्याने खोकला आणि श्वासोच्छ्वास कमी झाल्याचे लक्षात येते. धूम्रपान सोडल्यानंतर आपल्या रोजच्या जीवनशैलीत काय बदल करावेत? हायड्रेटेड राहा, समृद्ध संतुलित आहाराचे पालन करा वायुमार्गांना त्रास होऊ शकतो असा धूर आणि तीव्र गंध टाळा.

श्वासोच्छ्वासाचे व्यायाम

१. श्वास घेण्याचा सराव करा

२. चालणे किंवा पोहणे यांसारख्या सौम्य ॲरोबिक क्रियाकलापांमध्ये व्यग्र राहा

३. लवचिकता आणि श्वसन नियंत्रण एकत्र करण्यासाठी योगाचा विचार करा

४. योगा आणि व्यायामाला हळूहळू सुरुवात करा आणि हळूहळू त्यांची तीव्रता वाढवा. तुमच्या शरीराचे ऐका आणि आवश्यक असेल तेव्हा विश्रांती घ्या.

डॉ. हिरेमठ सांगतात, धूम्रपान सोडल्यानंतर केवळ २४ तासांच्या आत रक्तातील कार्बन मोनोऑक्साईडची पातळी कमी होते; ज्यामुळे हृदय आणि स्नायूंमध्ये अधिक ऑक्सिजन पोहोचू शकतो. तर दोन आठवड्यांपासून तीन महिन्यांपर्यंत फुप्फुसांचे कार्य आणि रक्ताभिसरण सुधारते. धूम्रपान सोडल्याने आरोग्य आणि जीवनाच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होऊ शकतात. तसेच सुमारे १९ वर्षांनंतर फुप्फुसाच्या कर्करोगाने मृत्यू होण्याचा धोका सध्याच्या धूम्रपान करणाऱ्यांपेक्षा निम्म्यावर येतो.

# गजाळी काट्यामध्ये होतेय अफरातफर

किनवट शहरात गजाळीमध्ये सर्वसाधारण नागरिकांची सर्रास लूट होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व दुकानदारांचे काटे अचानकपणे तपासणी करून ज्यावर असा प्रकार निदर्शनास येईल, त्यांच्यावर सक्त कारवाई करावी? अशी मागणी घर बांधकाम धारकांकडून होत आहे.

किनवट/शेख शौकत :- बांधकामासाठी गजाळी (स्टील) आवश्यक घटक असून किनवट शहर व गोकुंदा परिसरात सिमेंट एजन्सी दुकाने असून गजाळी काट्यामध्ये अफरातफर करून ग्राहकांची आर्थिक लूट करत असल्याचा प्रकार होत असल्याची चर्चा जोरदार सुरू आहे. सविस्तर असे की, किनवट शहर व गोगुंदा परिसरात बांधकाम म्हणजे नियमित झाले आहे. प्रत्येक जण आपापले नवीन घर व्हावे, या स्वप्नामध्ये गजाळीव



सिमेंट कितीही महाग झाले तरी बांधकामासाठी त्या वस्तूची सक्त जरुरत असते. शहरात सिमेंट व स्टील एजन्सी भरपूर ठिकाणी असून बांधकाम करणारे घरमालक केवळ क्विंटलाने गजाची मागणी करतात, परंतु त्याच्या पैशाच्या मोबदल्यात त्यांना तेवढी गजाळी मिळणे आवश्यक आहे, पण काही दुकानातून गजाळी ऑर्डर दिलेल्या क्विंटलपेक्षा काही प्रमाणात कमी मिळत असल्याची चर्चा जोरदार सुरू असून आता यामध्येही इलेक्ट्रॉनिक काटा प्रकार असल्याचे दिसून येत आहे सर्वसाधारण नागरिकांना घर बांधणे कठीण झाले असून बांधकामासाठी केवळ किनवट तालुक्यात रेतीवर बंदी असून बलाढ्य बांधकाम करणाऱ्यांना दोन नंबरची रेती रात्रीचा सहारा घेत उपलब्ध होते, परंतु सर्वसाधारण नागरिकांना ती अधिक पैशाअभावी भेटत नसल्यामुळे अनेकांचे घरांचे स्वप्न अधुरे राहत आहे तर एजन्सी मधून पाच ते दहा क्विंटल गजाळी घेतो म्हणताच त्यामध्ये वजनापेक्षा कमी गजाळी येत असल्याचा प्रकार ऐकावयास येत आहे.

# ऐक्याने वागल्यास भावी राजकारण आपली गुलामगिरी नाहीशी करील म्हणून सार्वजनिक कार्यासाठी एकजूट हवी._ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल अंतर्गत ७२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : ऐक्याने वागल्यास भावी राजकारणआपली गुलामगिरी नाहीशी करील म्हणून सार्वजनिक एकजूट हवी. या ऐतिहासिक विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त ३ नोव्हेंबर २०२४ ला ७२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. विलास रामटेके म्हणाले की, अल्पसंख्याक लोकांनी त्यांच्या मूल्यवर्धित ज्ञानाच्या बळावर समाजात परिवर्तन घडवून आणल्याचा इतिहास उपलब्ध आहे. म्हणून आपण संख्येने कमी असलो तरी निराश होऊ नये. आपण भारताचे संविधानानुसार समाजाच्या पुनर्रचनेचे कार्य केले पाहिजे. राज्य नागनाथांचे आले काय किंवा सापनाथांचे आले काय? आपले मरण अटळ आहे. म्हणून आपण सार्वजनिक कार्यासाठी एकजूट केली पाहिजे.



यापसंगी सुभाष ठोकळ म्हणाले की, राजकीय सत्ता ही सर्व समस्यांची गुरूकिल्ली असल्याने छोट्या मोठ्या कार्यक्रमांतून सुद्धा आपण प्रबोधनाची मालिका निरंतरतेने राबविली पाहिजे. समाजाला न्याय देण्यासाठी आपण आपले प्रतिनिधी विधिमंडळात पाठविले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपण समाज जीवनात समर्पित भावनेने दख्खलपात्र कार्य केले पाहिजे. प्रतीक पंचशील म्हणाले की सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते प्रतिस्पर्ध्यांना तोंड द्यायला असमर्थ ठरल्यास सरेंडर करतात. करिता जातीव्यवस्था नष्ट करून व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावी लागेल. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, लाभार्थी सदरील विधानाचे मर्म समजू न शकल्याने चळवळीची, समाजाची वाताहात होत आहे. ब्राह्मण इतरांशी निघृण व निष्ठूरपणे वागत असल्याने आव सर्वांसाठी आणतात, मात्र त्यातून निघणारे लोणी स्वतः खातात आणि ताक इतरांना देतात.

यापसंगी प्रमुख वक्ते पीईएसआर महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप वर्घट म्हणाले की, केवळ ऐक्य झाल्याने गुलामगिरी नष्ट होईल असे मुळीच नाही तरीही एकसंघ होऊन उपाययोजना केल्या पाहिजेत. आपला शेजारी सुद्धा सोबत येईल याची साश्वती नसल्याने ऐक्य हे स्वप्न ठरत चालले आहे. काही सेवानिवृत्तांना लोक जयभीम सुद्धा करीत नसतात कारण त्यांनी आयुष्यात समाजासाठी फार काही योगदान दिले नसते. इतरांना ऐक्याच्या प्रक्रियेत आणण्यासाठी आपण त्यांचे म्हणणे समजून घेतले पाहिजे. बहुतांश वेळा जवळची माणसेच आपल्याशी शत्रु प्रमाणे वागत असतात.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजातील उच्च शिक्षितांनी समाजाला संघटीत करण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. म्हणून आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून ऐकणा-यांमध्ये फुले शाहू आंबेडकर व्यक्त होण्याची क्षमता विकसित करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. ज्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ऐतिहासिक ८३२ शीर्षक उपलब्ध आहेत, ज्याचे प्रासंगिकतेनुसार वर्धापनदिन साजरे करून वर्तमानात आवश्यक संदेश प्रसारीत करून जनतेला समर्पक संदेश देण्यासाठी आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. आपण शिकलो असलो तरी सुशिक्षित नाही याची जाणीव ठेवून कौटुंबिक ऐक्यातून सामाजिक ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून समाजाला गुलामगिरीतून मुक्त करता येईल. करिता सामाजिक ऐक्यासाठी आपण नव्याने प्रयत्न करूया. याप्रसंगी मी सर्व वर्तमानपत्राचे अभिनंदन करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत.

या कार्यशाळेचे. सुत्रसंचालन विलास रामटेके यांनी केले. सुरूवातीला मान्यवरांचे हस्ते आदर्शांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या. या कार्यशाळेला इंजिनिअर किशोर पाटील, बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, प्राचार्य दिलीप वर्घट, उद्योजक मिलिंद बागूल, राहूल मेश्राम, प्रतीक पंचशील, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमाफी देणार : फडणवीसांची घोषणा

वाशिम : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली.

फडणवीस यांनी जनतेसमोर महायुती सरकारच्या काळात केलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. आणि पुन्हा एकदा महायुतीचे सरकार प्रस्थापित करण्यासाठी मतदारांना आवाहन केले. ते म्हणाले की, महायुती सरकारने राज्यात शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी, आणि युवकांसाठी अनेक लोकाभिमुख योजना राबवल्या आहेत. पुढे सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमाफी दिली जाईल, अशी मोठी घोषणा त्यांनी केली.दरम्यान, वाशीम शहरातील शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा यांनी उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. याचा लाभ पक्षाला या निवडणुकीत मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. फडणवीस म्हणाले की, ग्यायक पाटणी यांनी भाजपाची उमेदवारी मागितली होती, मात्र त्यांच्या राजकीय अनुभवाचा विचार करून पक्षाने त्यांना अजून थोडा वेळ मतदारसंघात काम करण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे असंतुष्ट झालेल्या पाटणी यांनी भाजप सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि तिकिटाची मागणी केली.

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, पाटणी यांनी निवडलेला मार्ग कठीण आहे, आणि त्यांचा निर्णय त्यांच्या भविष्यासाठी आव्हानात्मक ठरेल. शिवसेनेच्या भावना गवळी (रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघ), भाजपचे श्याम खोडे (वाशीम) आणि सई प्रकाश डहाके (कारंजा) या महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन जनतेला केले.

# वांचितचे उमेदवार विनोद खटके यांनी मार्केट यार्ड येथील व्यापारी व हमाल माथाडी कामगारांच्या गाठी - भेटी



लातूर :- लातूर विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार विनोद खटके यांनी आज ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मार्केट यार्ड येथे जाऊन व्यापारी व हमाल माथाडी कामगारांच्या भेटी घेतल्या आणि गॅस सिलिंडरला मतदान करून आपणास निवडून देण्याचे आवाहन केले. प्रारंभी मार्केट यार्ड मधील गोरी शंकर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर लोकसेवा माथाडी कामगार युनियनच्या वतीने उमेदवार विनोद खटके यांचा शाल, श्रीफळ देऊन आणि पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी लोकसेवा माथाडी कामगार युनियचे अध्यक्ष भरत कांबळे, अमोल कांबळे, ज्ञानेश्वर माने, राजेंद्र माने व इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण मार्केट यार्ड मध्ये वाजत गाजत पदयात्रा काढून प्रत्येक व्यापारी व हमाला माथाडी कामगारांशी प्रत्यक्ष भेटून चर्चा केली आणि गॅस सिलिंडरला मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांच्या सोबत हजारो कार्यकर्ते होते.



# कोरोना काळात राजेश टोपेंचे कार्य उल्लेखनीय

घनसावंगी : कोरोना काळात राजेश टोपे हे राज्याचे आरोग्यमंत्री म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या खांद्याला खांदा लावून लढले, असे गौरवोद्गारही अंधारे यांनी काढले. महाविकास आघाडीचे उमेदवार राजेश टोपे यांच्या प्रचारार्थ घनसावंगी येथे आयोजित जाहीरसभेत सुषमा अंधारे यांनी महायुतीवर जोरदार टीकास्त्र सोडले. खासदार इम्रान प्रतापगडी, उमेदवार राजेश टोपे, खासदार संजय जाधव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. गेल्या काही दिवसांपासून राज्यात लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. पुण्यात दोन अल्पवयीन मुलींवर स्कूल बसचालकाने लैंगिक अत्याचार केला. बदलापूर घटनेनंतर तब्बल बारा घटना राज्यात घडल्या आहेत. गृहमंत्र्यांकडून शून्य अपेक्षा



असून ते लेकीबाळीला अजिबात सुरक्षा देऊ शकत नाहीत, अशा शब्दांत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयासमोर एक महिला येऊन तोडफोड करते तर मग प्रश्न उपस्थित होतोय की गृहमंत्र्यांची सुरक्षा इतकी कमकुवत असेल तर इतर लोकांचे काय? गृहमंत्री सुरक्षित नसतील तर महाराष्ट्राच्या लेकीबाळींना सुरक्षा कोण देणार? मंत्र्यांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा असेल तर निश्चित ही चिंतेची बाब आहे. सुरक्षा भेदून अशा प्रकारे व्यक्ती येते हे दुर्दैव आहे. फेसबुकला लाईव्ह करून गोळीबार करण्यात येतो. आमदार बाबा सिद्दिकी यांची दिवसा हत्या करण्यात येते. लाडकी बहीण योजनेतून दीड हजार रुपये दिले,

बहिणीला दिलेल्या पैशांचे भावाकडून क्रेडिट घेतले जात नाही. यामुळे तुम्ही क्रेडिट घेऊ नका, आपण कधी बहिणीला पैसे दिले म्हणून बॅनर लावलेत का? आपल्याला नात्यांची किंमत कळते, त्यांना बहिणीचे नाते कळत नाही, असा टोला अंधारे यांनी यावेळी महायुती सरकारला लगावला. या उलट त्यांनी बहिणीची थट्टा केली हे संस्कार नाहीत.

# महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली  मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद









उदगीर / प्रतिनिधी :– उदगीर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभाग क्र. ८ मधून भव्य रॅली काढली. प्रभागातील नागरिकांनी या रॅलीस उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार गोविंदराव केंद्रे यांच्या हस्ते या रॅलीचा चौबारा येथे शुभारंभ करण्यात आला. चौबारा येथून निघालेली ही रॅली जुने बालाजी मंदिर, होळी चौक, पारकट्टी गल्ली, तळवेस मार्गे फुले नगर येथे आल्यानंतर या ठिकाणी रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे यांनी गेली पाच वर्षे उदगीरचे आमदार व राज्याचे मंत्री म्हणून काम करीत असताना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी येथील जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली आहे अशा प्रामाणिक नेतृत्वाला जपण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा एकदा ना. संजय बनसोडे यांना निवडून द्यावे असे आवाहन माजी आमदार गोविंद केंद्रे यांनी केले. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, सुधीर भोसले, समीर शेख, अनिल मुदाळे, समद शेख, राजकुमार मुक्कावार, उत्तरा कलबुर्गे, राजकुमार हुडगे, फैजुखान पठाण, इम्तियाज शेख, दत्ता पाटील, अनिल मुदाळे, गिरीश उप्परबावडे, अभिजित औटे, पप्पु गायकवाड, मझहर पटेल, अमोल अनकल्ले, रुपेंद्र चव्हाण मारोती कोटलवार, शफी हाशमी, व्यंकट बोईनवाड, राजकुमार हुडगे, नामदेव आपटे, सतिश कांबळे, राजकुमार गंडारे, ॲड. वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, शामला कारामुंगे, मंदाकिनी जीवने, उषा माने, सरोजा वारकरे, शिवकर्णा अंधारे,स्वाती वट्टमवार, बबीता पांढरे, शिवगंगा बिरादार, अभिजीत औटे, रामेश्वर पवार,आनंद बुंदे, संजय जाधव नामदेव आपटे, धोंडीबा मोरे, फैयाज शेख, शफी हाशमी, अमर सूर्यवंशी, आकाश झिल्ले, बाबासाहेब सूर्यवंशी, अविनाश गायकवाड, संजय पांढरे, अनिकेत गुडमेवार, प्रशांत रंगवाळ, प्रसाद पांढरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी मतदाराच्या गाठीभेटी घेऊन रेणापूर शहर ढवळून काढले





लातूर :– लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी रेणापूर शहरातील विविध प्रभागात अनेक ठिकाणी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन मतदानरुपी आशीर्वाद मागितले. आ. कराड यांच्या माध्यमातून झालेल्या कोट्यावधी रुपये खर्चाच्या विविध विकासमुळे विविध समाजातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून रेणापूर शहरात राज्यातील महायुती शासन सत्तेवर आल्यापासून आदिशक्ती रेणुकादेवी मंदिर परिसरात भक्तनिवास, रेणा नदीचा घाट बांधकाम व सुशोभीकरण, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, ईदगाह मैदान आणि कब्रस्तान संरक्षण भिंत, रेणापूर शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना, शहरातील पथदिवे, रेड्डी समाज सभागृह, श्रीबालाजी मंदिर येथे भव्य सभागृह, श्रीराम मंदिर परिसर विकास, अशोक सम्राट बौद्ध विहार, नगरपंचायत प्रशासकीय इमारत, संत रोहिदास मंदिर सभागृह, खंडोबा मंदिर सभागृह, अमृतेश्वर मंदिर सभागृह, हनुमान मंदिर सभागृह, स्वामी समर्थ मंदिर सभागृह, अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर, विविध प्रभागातील स्मशान भूमी, दहा अंगणवाडी विकसित करणे, रेणापूर शहरासह नगरपंचायत अंतर्गत असलेल्या वाडी तांड्यात अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, गरजूंना घरकुले यासह मूलभूत सुविधा आणि सार्वजनिक विकासाबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजना मोठ्या प्रमाणात मिळाल्याने प्रचार दौऱ्यात प्रत्येक प्रभागातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. रेणापूर शहरातील सानेगुरुजी नगर, रूपचंद नगर, नेहरूनगर, रामनगर, ढोर गल्ली, लिंगायत गल्ली, एकुरके गल्ली, गाडे गल्ली, बालाजी मंदिर, कातळे गल्ली, येलम गल्ली, नासरजंग, श्रीराम नगर, संजय नगर या परिसरातील मतदारांच्या आ. रमेशआप्पा कराड यांनी गाठीभेटी घेतल्या. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, भाजपा विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, पहिली नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, जिल्हा भाजपाचे सतीश आंबेकर, चंद्रकांत कातळे, ज्ञानोबा भिसे, श्रीकृष्ण जाधव, शिवसेनेचे कुलदीप ठाकूर, रवी चव्हाण, सुधीर तोडकरी, अच्युत कातळे, संतोष राठोड, धम्मानंद घोडके, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, महेश गाडे, श्रीकृष्ण मोटेगावकर, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, प्रवीण कोतवाड, राजू आलापुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

पाच वर्षांपूर्वीचे रेणापूर आणि आजचे रेणापूर यात खूप मोठा विकसनशील बदल झाल्याने शहरातील विविध समाजातील मतदारात मोठे उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. प्रत्येक ठिकाणी आ. रमेशआप्पा कराड यांचे महिलांनी औक्षण करून विजयीभव अशा शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधवांनी ही आप्पांचा यथोचित सत्कार करून मताधिक्य मिळवून देण्याची ग्वाही दिली.

रेणापूर शहरातील मतदारांच्या गाठीभेटी प्रचार दौऱ्यात आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या विविध विकास कामाच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहून भविष्यात उर्वरित सर्व कामांना गती देण्यासाठी मला आशीर्वाद द्यावेत काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन केले.

या प्रचार दौऱ्यात भाजपाचे दिलीप आकनगिरे, श्रीमंत नागरगोजे, अंतराम चव्हाण, नारायण राठोड, रामा चव्हाण, सचिन इगे, लखन आवळे, मनोज चक्रे, हनुमंत भालेराव, गणेश माळेगावकर, जगन्नाथ कातळे, राजू आतार, गणेश चव्हाण, शरद चक्रे, हनुमंत इंगे, अनिल चक्रे, नंदकुमार बंडे, सचिन शिरसकर, शिवसेनेचे रखमाजी जोगदंड, बाळू माळेगावकर, श्याम राजे, सुरेखा चव्हाण, मनीषा मुंडे, रुक्मिणी इंगळे, महेश कलशेट्टी, शंकर कापसे, सचिन भोकरे, लक्ष्मण खलंगरे, हनुमंत आकनगिरे, शेख शहेनशहा, शेख मकसूद शेख दोष आवेश कुरेशी सोपान सातपुते, शेषराव पवार, ज्ञानोबा सातपुते, विशाल कांबळे, संजय विरुळे, सोमनाथ सातपुते, रावसाहेब कातळे, नरहरी डावळे, लिंबराज गायकवाड, महेश वरवटे, अजय मारलापल्ले, सुरज फुलारी व्यंकटेश दरोडे, नागेश बस्तापुरे, रफिक शिकलकर, सलीम मिस्तरी, विकी राजे, गणेश आकनगिरे, मनोहर सेदरकर, शशिकुमार अकनगिरे, अफजल सय्यद, विनोद गायकवाड, प्रशांत बंडे, गोविंद काळे, लक्ष्मण दळवी, वसंत काळे, मोतीराम कांबळे, शिवाजी भावे, भगवान काळे, गणेश भोकरे, दिलीप कांबळे, श्रीकांत राठोड, हनुमंत आडसकर, गोविंद माळेगावकर, रोहित खुमशे, गोविंद कटके, राहुल चव्हाण, निमराज चव्हाण महादेव राठोड संजय चव्हाण, जयवंत आडसकर, शंकर गाडे, शेषराव वाघमोडे, रंगनाथ एकुरके, काशिनाथ गवळी, श्रीकांत राठोड यांच्यासह अनेक जण होते

## 'विरोधकांकडून जीवाला धोका'

मुंबई: सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुलुंड विधानसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा यांनी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ) एस. चोक्कलिंगम यांना पत्र लिहिले आहे. तीन अज्ञात लोकांकडून त्यांच्या सुरक्षेचा भंग करण्याचा आणि त्यांच्या जीवाला हानी पोहोचवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल हे पत्र लिहिले आहे. यामागे आपले विरोधक असल्याचे सांगत कोटेचा यांनी याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली. असे कृत्य आचारसंहितेचे उल्लंघन करणारे आणि आपला जीव धोक्यात घालणारे असल्याचे सांगून कोटेचा यांनी या तिघांवर कठोर कारवाई व तपास करून त्यांचे हेतू जाणून घेण्याची मागणी केली. मुख्य निवडणूक अधिकारी यांना लिहिलेल्या पत्रात कोटेचा यांनी शुक्रवारी दिवसाचा प्रचार संपल्यानंतर मुलुंड (पश्चिम) येथील एका हॉटेलमध्ये त्यांच्या टीम मेंबर सोबत जेवत असताना घडलेली घटना नमूद केली. हे पत्र वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनाही पाठविले आहे.



याबाबत सांगताना कोटेचा म्हणाले कि पांढऱ्या रंगाच्या वॅगनआर या कारमध्ये तीन संशयास्पद व्यक्ती तेथे आल्या. त्यांनी माझ्या सुरक्षा पथकाला सांगितले की मी त्यांना फोन करून भेटायला बोलावले आहे. माझ्या सुरक्षा रक्षकांनी चौकशी केली तेव्हा त्यातील एका व्यक्तीने त्याचे नाव नितीन भाई असे सांगितले. मात्र, मी कोणालाही फोन केलेला नव्हता. तेच मी माझ्या सुरक्षा रक्षकाना सांगितले. पण माझा ठावठिकाणा त्यांना कसा कळला या विचाराने मला धक्का बसला, असे कोटेचा म्हणाले. ईशान्य मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवलेल्या कोटेचा यांनी पुढे सांगितले की, लोकसभेच्या प्रचारादरम्यान त्यांच्यावर अनेकदा हल्ले झाले. माझ्या बॅक ऑफिसवरही हल्ला करण्यात आला. दोनपेक्षा जास्त एफआयआर दाखल करण्यात आले. मला स्पष्टपणे संशय आहे की माझे विरोधक पुन्हा एकदा माझ्या जीवाचे बरेवाईट करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## देशमुख परिवाराकडून लातूरकरांची प्रामाणिक सेवा सेवेची ५० वर्षे, हप्तेखोरी, लुटारू संस्कृतीला कधीच थारा दिला नाही

लातूर / प्रतिनिधी :– माजी मुख्यमंत्री विकासरत्न विलासराव देशमुख यांनी लातूर शहरचे प्रतिनिधित्व करीत असताना लातूरला विकासाच्या उंचीवर नेण्याचे काम करीत असताना केवळ राज्याच्याच नव्हे, तर देशाच्या आणि जगाच्या नकाशावर लातूरला नेऊन ठेवले. विकासरत्न विलासराव देशमुख यांनी घालून दिलेली विकासाची परंपरा पुढे घेऊन जाण्याचे काम माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मागील १५ वर्षांपासून सुरू आहे. लातूरकरांची प्रामाणिक सेवा हेच देशमुख परिवाराचे ब्रिद असून, विविध योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास कसा होईल, याचा ध्यास हा परिवार घेतो. त्यामुळेच जिल्ह्याच्या विकासाला गती प्राप्त झाली. इथे हप्तेखोरी, खंडणी, पावत्या फाडण्याची संस्कृती कधीच रुजली नाही. उलट जनतेच्या पैशांचा योग्य विनियोग आणि आपल्या भागाच्या विकासालाच सातत्याने प्राधान्य देण्याचे काम झाले.

देशमुख परिवाराला सामाजिक आणि राजकीय जीवनात ५० वर्षे होत आहेत. या कालावधीत लातूरच्या हितासाठी, भल्यासाठीच काम करायचे, हेच धोरण ठरवून विकासाला चालना देण्याचे काम केले. आतापर्यंतच्या सार्वजनिक जीवनात कधीच कोणाची फसवणूक केलेली नाही किंवा हप्तेखोरी, खंडणी, पावत्या फाडण्याच्या कामालादेखील कधी लातुरात थारा दिला नाही. एकच ध्यास, लातूरचा विकास हीच भूमिका मागील ५० वर्षांच्या कालावधीत घेतली. त्यामुळेच लातूरचा सर्वांगीण विकास होऊ शकला. अर्थात, एकेकाळी एक तालुक्याचे गाव असताना लातूरने आधीचा जिल्हा असलेल्या धाराशिवच्या पुढे कित्येक पटींनी झेप घेतली. विकासाची दूरदृष्टी आणि सर्वसामान्य, शेतकरी, शेतमजुरांचे हित हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून काम केल्याने आजपर्यंत लातूरचा सर्वांगीण विकास होऊ शकला. हीच विकासाची परंपरा आजही पुढे सुरू असून, लातूरच्या विकासासाठी विकासनिधी खेचून आणून सर्वांगीण विकास करण्याचे काम माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी केले.

गेल्या पाच वर्षांत मतदारसंघात तब्बल २ हजार ४०० कोटींचा निधी खेचून आणून विकासाला चालना दिली. शादिखाना, नाट्यगृह, वाढती वाहतूक लक्षात घेऊन विलासराव देशमुख यांच्या नावाने पर्यायी मजबूत रस्ता लातूरकरांना उपलब्ध करून दिला. तसेच जिल्हा रुग्णालय, सिटी बस सुविधा, महिलांना मोफत प्रवास, कचरा वाहतुकीसाठी घंटागाड्यांची सोय, सांडपाण्याच्या व्यवस्थापनाचे नियोजन, लातूर शहरात नव्याने पाईपलाईन यासह लातूरकरांची सोय होईल, अशा किती तरी योजना राबविण्याचे काम माजी मंत्री अमित देशमुख यांनी केले.

लातूर हा एकेकाळी धाराशिव जिल्ह्याचा एक तालुका होता. १९८२ मध्ये धाराशिवमधून लातूर जिल्हा स्वतंत्र झाला. त्यानंतर विकासरत्न विलासराव देशमुख यांनी लातूरच्या विकासाचा ध्यास घेऊन विविध योजना आणि नव–नवे प्रकल्प जिल्ह्यात आणून जिल्ह्याच्या विकासाचा चालना दिली. १९८४ मध्ये माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते लातूरच्या माळरानावर मांजरा कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली आणि १९८६ मध्ये या कारखान्याचे पहिले गाळप सुरू झाले. तेव्हापासून साखर कारखानदारीच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांचा विकास झाला. अर्थात, मांजरा पट्ट्यात सिंचन क्षेत्र वाढावे आणि शेती उत्पादनाला चालना मिळावी, यासाठी मांजरा नदीवर ठिकठिकाणी बॅरेजेस उभे करून पाणी अडवित मांजरा काठावरील सिंचन क्षेत्र वाढविले आणि उसाचे अधिकाधिक उत्पादन घेऊन मांजरा कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एफआरपीपेक्षा जास्त दर देत शेतकऱ्यांचा विश्वास संपादित केला.

माजी मंत्री आमदार अमित देशमुख हेदेखील हीच विकासाची परंपरा पुढे नेण्याचे काम करीत आहेत. त्यांनीही साखर कारखानदारीत हीच भूमिका ठेवून मांजरा परिवाराचा विस्तार केला. आज मांजरा परिवाराचे १० साखर कारखाने सुरू आहेत. एक तर मांजरा परिवारातील साखर कारखान्यांतून शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपीपेक्षा जास्त दर मिळत आहे आणि दुसरे म्हणजे युवक, शेतमजूर, शेतकऱ्यांच्या हाताला कामही मिळत आहे. त्यामुळे या कारखानदारीतून हजारो तरुण, शेतमजुरांना रोजगार देण्याचे काम देशमुख परिवाराने केले आहे.



लातूरमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, प्रशस्त आणि सर्व सोयींनी युक्त जिल्हा रुग्णालय, विद्यापीठाचे उपकेंद्र, विविध विभागांचे विभागीय कार्यालय, रेल्वेसेवा, जिल्ह्यात सोयाबीन उत्पादन वाढताच तेल उद्योग क्षेत्रातील कंपन्यांना प्रोत्साहन, शैक्षणिक विकासाला चालना, लातूर पॅटर्नची स्वतंत्र ओळख यासह किती तरी विकासकामे लातूरच्या विकासाला चालना देणारी ठरली. माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनीही कोरोनाच्या काळात भरीव कामगिरी केली. तसेच ऑक्सिजन प्लँट, तपासणी केंद्र, कोविडसाठी डेडिकेटेड रुग्णालयाची सुविधा, सुपर स्पेशालिस्ट रुग्णालय, लातूरकरांसाठी नवीन पर्यायी रस्ता, शादिखाना, नाट्यगृह यासह नवीन पाईपलाईन, अंतर्गत रस्ते, मतदारसंघातील गावांत नळ योजना, पाईपलाईन, रस्ते मजबुतीकरण यासारखी बरीच कामे करून विकासाला चालना दिली. देशमुख कुटुंबीयांनी कधीही कुठलाही स्वार्थ न ठेवता केवळ जिल्ह्याचा आणि आपल्या मतदारसंघाचा विकास एवढेच ध्येय ठेवून आतापर्यंत प्रामाणिकपणे सेवा केली आहे. त्यामुळे देशमुख परिवार हेच खरा जिल्ह्याचा आणि आपल्या मतदारसंघाचा विकास करू शकतात, हे आजपर्यंतच्या कामातून दाखवून दिले आहे. देशमुख यांच्या पाठीशी उभे राहण्याची हीच योग्य वेळ

भाजप सातत्याने आयात उमेदवारावर भर देऊन देशमुख कुटुंबीयांना आव्हान देण्याचा प्रयत्न करीत असते. दर पाच वर्षाला नवा प्रयोग होत असतो. परंतु लातूरची जनता आजपर्यंत केलेल्या विकासकामांवर मतदान करते. ज्यांच्या हातून लातूरचा खरा विकास होतो, त्याच्याच पाठीशी येथील जनता उभी राहते. आजपर्यंत याचीच प्रचिती आलेली आहे. माजी मंत्री अमित देशमुख हे जिल्ह्याचे पालकमंत्री राहिलेले आहेत. तरुण नेतृत्व आणि पक्षावर आणि मराठवाड्यात त्यांची असलेली पकड आणि पक्षात असलेले मानाचे स्थान हे पाहता महाविकास आघाडीत त्यांना नक्कीच मानाचे पान मिळणार आहे. त्यामुळे लातूरच्या नेतृत्वाला भक्कम पाठिंबा देण्याची हीच खरी वेळ आहे, असे मतदारांमधून बोलले जात आहे.

युती सरकारच्या काळात लातूरमध्ये हप्तेखोरी

मधल्या काळात २०१४ ते २०१९ या कालावधीत राज्यात देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेवर होते. त्यावेळी लातूरचे पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर होते. त्या काळात लातूरमध्ये हप्तेखोरीसह काय, काय झाले, याची कल्पना लातूरकरांना आहे. एवढेच काय तर जिल्हा परिषद, महापालिका असो की, जिल्ह्यातील विकास कामांसाठी निधी असो, यातदेखील कमिशनखोरी चालली. मागच्या अडीच वर्षांत तर भाजपचे गिरीश महाजन पालकमंत्री होते. परंतु अडीच वर्षाच्या काळात त्यांनी जिल्ह्यात पालकमंत्री म्हणून कधीही पूर्णवेळ हजेरी लावली नाही. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री कोण होते, याचाही अनेकदाविसरपडला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE